दि. 30.04.2025

# प्रेसनोट

## 01 मे पासून नांदेड परिक्षेत्रात 'अवैध व्यवसाय विरोधी अभियान -१'

दिनांक १ मे ते ३१ मे, 2025 दरम्यान, नांदेड परिक्षेत्रात 'अवैध व्यवसाय विरोधी अभियान-१' चे आयोजन करण्यात आले आहे.

मागील विधानसभा निवडणुकीदरम्यान, परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांना पायबंद घालण्यासाठी, परिक्षेत्रातील नांदेड, परभणी, हिंगोली व लातूर या चारही जिल्ह्यांत एकाच वेळी मासरेड चे आयोजन करण्यात आले होते. विधानसभा निवडणुकी दरम्यान अशा एकूण सहा मासरेड आयोजित करण्यात आल्या होत्या व त्यायोगे अवैध व्यवसायांविरोधात मोठ्या स्वरूपाच्या कारवाया झाल्या होत्या.

| अ.क्र. | जिल्हा | एकुण केसेस | आरोपी संख्या | जप्त मुद्येमाल |
|---|---|---|---|---|
| 1 | नांदेड | 412 | 419 | 18,47,110 |
| 2 | परभणी | 280 | 283 | 13,76,631 |
| 3 | हिंगोली | 166 | 177 | 5,43,416 |
| 4 | लातूर | 412 | 347 | 34,57,652 |
| **एकूण** | | **1270** | **1226** | **72,24,809** |

उपरोक्त प्रमाणे, सदर (6) मास रेड दरम्यान, एकूण ( 1226) अवैध व्यावसायिकांविरुद्ध एकूण (1270 ) एवढ्या केसेस दाखल करण्यात आल्या होत्या व एकूण (72, 24, 809) रुपयांचा माल हस्तगत करण्यात आला होता.

चालू महिन्यात दिनांक 13.04.2025 रोजी परिक्षेत्रात अवैध व्यावसायिकांचे विरुद्ध आणखी एक मासरेड आयोजित करण्यात आली होती. सदर मासरेडचे दरम्यान देखील चारही जिल्ह्यात एकूण (268) आरोपींविरुद्ध, (267) केसेस करण्यात आल्या होत्या व त्यायोगे (13,27,487) रुपयांचा माल हस्तगत करण्यात आला होता.

तथापि, परिक्षेत्रात सुरू असलेल्या अवैध दारू, मटका, जुगार, ऑनलाइन लॉटरी, क्रिकेट बॅटिंग, गुटखा, अंमली पदार्थ, वेश्याव्यवसाय, वाळू उपसा व वाहतूक, अवैध प्रवासी वाहतूक इत्यादींना आळा घालण्याकामी व्यापक मोहिमेची आवश्यकता लक्षात घेऊन, दिनांक १ मे पासून म्हणजे महाराष्ट्र दिनापासून परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांत ' **अवैध व्यवसाय विरोधी अभियान**-1' चे आयोजन करण्यात आले आहे.

सदर मोहिमेत, पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी, अंमलदार यांचेसह सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी व अपर पोलीस अधीक्षक हे सहभागी होणार आहेत. त्याचप्रमाणे, स्थानिक गुन्हे शाखा व विशेष पोलीस पथके ही देखील कारवाईत सहभागी होणार असून, संबंधित जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक हे अवैध व्यवसाय विरोधी कारवायांवर देखरेख ठेवणार आहेत.

सदर मोहिमेदरम्यान, सातत्याने अवैध व्यवसाय सुरू ठेवणाऱ्या व्यावसायिकांविरुद्ध तडीपार, एम.पी.डी.ए. व प्रकरण परत्वे मोक्का कायद्याखाली देखील कारवाई करण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, नागरिकांनी नजीकच्या पोलीस ठाण्यास अथवा पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाच्या **nandedrange.mahapolice.gov.in** या संकेतस्थळावर कळवून आपल्या भागातील अवैध व्यवसायांचा बिमोड करण्यासाठी आपला हातभार लावावा, असे आवाहन पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी केले आहे.

कार्यालय पोलीस उप महानिरीक्षक,
नांदेड परिक्षेत्र, नांदेड